श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

मासिक पुस्तक.

वर्ष १२ अंक ३ ] ज्येष्ठ [ श. १८५७

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका

—शंकराचार्य.

संपादकः—रामचंद्र आत्माराम तर्खड

# अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| | | पृ. |
| अनुभव | ... ... ... ... | १-१७ |
| मे महिन्याचें शिर्डीवृत्त | ... ... ... | १८-२० |
| शिर्डी संस्थानच्या | ... ... ... | |
| मालकीच्या वस्तूंची यादी | ... ... | २१-३० |

## विनंति

वर्गणीदारांस नम्र विनंती करण्यांत येत आहे की, ज्यांनी वर्गणी अद्यापि पाठविली नाही, त्यांनी कृपा करून ती खालील पत्त्यावर पाठवून द्यावी, अथवा V. P. करण्याचें सुचवावें.

**रा. आ. तर्खड,**
व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**
५१ E. पार्ला रोड, खार, मुंबई २१; आणि ऑ. खजिनदार,
**श्रीसाईबाबा शिरडी संस्थान**

## कै. श्रीम्हाळसापति अंक

श्रीसाईसद्भक्तांच्या सोयीसाठीं कै. म्हाळसापति अंक वेगळा प्रसिद्ध करण्यांत आला आहे. किंमत ३ आणे. तरी जिज्ञासूंनी त्याप्रमाणें मागणी करावी, ही विनंती.

**रा. आ. तर्खड,**
व्यवस्थापक—**श्रीसाईलीला कचेरी**

## श्रीसाईभक्तांस विज्ञप्ति

कोणाला श्रीसाईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनी ते आमच्याकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

**रा. आ. तर्खड,**— प्रकाशक

# अनुभव

श्रीयुत बाबासाहेब तर्खड यांसी सप्रेम सा. न. वि.

श्रीसाईबाबांच्या समाधीच्या संगमरवरी चवुतऱ्यांतून, दोन ठिकाणीं पाणी पाझरत असल्याचें अलीकडे ( कडक उन्हाळ्यांत ) दिसून येतें; ह्या विषयावर प्रो. नरके ह्यांच्याशीं शिर्डी येथें झालेल्या कार्यकारणविषयक आपल्या संवादाची माहिती आपण मला सांगितल्यावर दुसऱ्या एका क्षेत्रां-तील समाधीवर—पण निराळ्या रूपांत—होणाऱ्या जलाभिषेकाची माहिती मीं आपणास सांगितली होती. ती लिहून पाठवावी म्हणून कळविल्यावरून, समाधिपुरुष व क्षेत्र यांचाही परिचय होईल अशी त्रोटक माहिती खालीं देत आहें.

दक्षिण कोंकणांत वेंगुर्लें ( जि. रत्नागिरी ) शहरापासून उत्तरेकडे सुमारें तीन मैल अंतरावर, **"वागलांची राई"** या नांवाचें, एका टेंकडीच्या पायथ्यापासून चढणीच्या जवळच्या भागावर वसलेलें एक क्षेत्र आहे. या स्थळाची नैसर्गिक रमणीयता पाहणाऱ्यास तल्लीन करून सोडते. ह्या ठिकाणीं शांकरपरंपरेंतील श्री. प. प. श्रीसच्चिदानंद स्वामीमहा-राजांचा मठ असून गर्भागारांत श्रींची समाधि आहे. श्रींना समाधिस्थ होऊन सुमारें दोनशें वर्षें झालीं असावीं. श्रींनीं पूर्वाश्रमांत, योग्यांना उचित असें हें अरण्यमय स्थल "जपस्थान" म्हणून पसंत केलें होतें, तेंच पुढें त्यांचें समाधिस्थान झालें. श्रींचे गुरु दाभोली मठ संस्थापक श्रीमद्विद्यापूर्णानन्द हे होत. त्या डोंगरी स्थळांत वाघांची वसती असे, म्हणून त्याला "वागु-लांची राई" म्हणण्याचा प्रघात पडला. आजमितींसही मठ स्थलाच्या आजू-बाजूस वाघांचें अस्तित्व दिसून येतें, पण त्याच्यापासून कोणासही उपसर्ग होत नसतो. श्रींच्या पूर्वाश्रमींचें नांव रुद्राजीपंत; हे भारद्वाज गोत्री ऋग्वेदी ब्राह्मण होत.

श्रींच्या मठासमोर एक जुनाट अश्वत्थवृक्ष आहे. त्यासंबंधीं असें पाहण्यांत येतें की, कितीही सोसाट्याचा वारा वाहत असला, तरी इतर पिंपळवृक्षांप्रमाणें त्याच्या पानांचा आवाज होत नाहीं. त्याविषयीं श्रींच्या आज्ञेनेंच त्याचा आवाज बंद झाल्याची एक गोष्ट ऐकण्यांत येते, पण ती विस्तारभयास्तव येथें देत नाहीं. या राईंत लहान-मोठे आणखी अश्वत्थवृक्ष आहेत; त्यांच्या पानांचा सळसळ आवाज होत असतो.

या श्रींच्या समाधीवर शिवपिंडी स्थापन केली असून, वर अभिषेक-पात्र टांगण्यासाठीं गर्भागाराच्या भिंतीमध्यें, सुमारें वीतभर लांबी-रुंदीच्या खांचींत, सहज फिरवितां येईल अशी सागाची तुळई दक्षिणोत्तर आडवी ठेवलेली असते. प्रतिवर्षी महाशिवरात्रीच्या दिवशीं वरील तुळईच्या दोन्ही टोकांकडील सुमारें एकेक फुट लांबीचा भाग साफ कोरडा राहून पुढील सर्व भाग पाण्यानें थबथबलेला दिसून येतो. कांहीं वेळानें त्या ओल्या भागांतून पाण्याचे थेंब निघूं लागतात, व ते सर्व तुळईच्या मध्यभागीं येऊन एकत्रित होतात. याप्रमाणें एकत्र ( Centralize ) झाल्यावर त्यांची एक लहानशी धार बनून ती अभिषेकपात्रांत पडत असते. तुळईच्या ज्या भागांतून पाण्याचे थेंब उत्पन्न होतात, तो भाग कांहीं दिवसांनीं शेवा-ळानें आच्छादिल्यासारखा दिसत असतो. वरील चमत्कार पाहण्यासाठीं शिवरात्रीच्या दिवशीं अनेक गांवचे लोक त्या स्थळीं येत असतात. या-प्रमाणें महाशिवरात्रीच्या दिवसापासून ज्येष्ठापर्यंत ( मृगपूर्व ) श्रींच्या समाधी-वर गेलीं दीड-पावणेंदोनशें वर्षें हा अभिषेक सुरू आहे. पावसाळ्यांत तुळई कोरडी असते.

कित्येक शास्त्रज्ञ ( B. Sc., M. Sc., असे ) पदवीधर व कैक विद्वान् जिज्ञासु गृहस्थांनीं तेथें जाऊन वरील घटनेसंबंधीं बारकाईनें तपास केला आहे; परंतु एकानेंही त्याचा कार्यकारणसंबंध दाखवून दिलेला नाहीं. एका शास्त्रज्ञानें लांकडी तुळई काढून (ती सहज बाहेर काढतां येते) तिच्या

जागी तेवढ्याच लांबीचा वाळलेला बांबू ठेवून दिला. सुमारें अर्ध्या तासांत त्या बांबूतूनही पाण्याचे थेंब निघालेले दिसून आले !

प्रस्तुत लेखक मुंबईंत असतांना त्याला एका गृहस्थानें सांगितलें होतें कीं, तेथील पुजाऱ्यांच्या बायका मठाच्या भिंतींतील छेदांत सकाळींच पाणी ओतीत असतात, व तें पाणी तुळईंत जावें अशी तींत कुशलतेनें व्यवस्था केलेली आहे. वरील माहितीची सत्यासत्यता पाहण्यासाठीं प्रस्तुत लेखक कांहीं मंडळीसह सन १९०७ सालीं मे महिन्यांत तेथें गेला होता. त्या वेळीं समाधीवर अभिषेक करून पूजा वगैरे केल्यावर, व श्रीपुढें प्रणामपूर्वक हेतु निवेदन केल्यावर, समाधिवरील तुळई खांचीतून बाहेर काढून भिंती व दोन्ही खांचा त्यानें तपासून पाहिल्या. त्या पक्क्या दगडी भिंतींत पाण्याचा लवलेशही त्याला आढळला नाहीं. त्यानंतर तुळईची तपासणी केली;तिच्यांत छेद पाडलेलें किंवा बारिक छिद्रें (porositys) वगैरे कांहींच नसून ती भरीव ( solid ) असल्याची सर्वांची खात्री झाली. तुळई एका मनुष्याला उचलण्याइतकी हलकी नव्हती, म्हणून दोघांनीं ती खांचांतून बाहेर काढिली व पुनः वर ठेऊन दिली. तुळई जमिनीवर असेपर्यंत तींतून पाण्याचे थेंब निघत नव्हते, पण तीच पुनः वर ठेवल्यानंतर थोड्याच अवकाशांत तिच्यांतून पूर्ववत् अभिषेक सुरू झाल्याचें सर्वांस दिसून आलें.

पुनः कांहीं कामानिमित्त १९१५ सालीं, लेखक कोंकणांत गेल्या वेळीं, सदरील समाधिस्थानच्या दर्शनास गेला होता. त्या वेळीं तुळईतून निघणारें पाणी एका लहानशा कुपींत भरून आणलेलें आज त्याच्या संग्रहांत आहे. त्या वेळीं हेतु असा होता कीं, ते डॉ. मॅनकडे पाठवून त्याचे गुणधर्म तपासून घ्यावे. पण तशी चिकित्सा करून घेऊं नये असें कांहींचें म्हणणें दिसल्यावरून, कुपीवर लाख लावून ती तशीच ठेवण्यांत आली आहे. असो.

श्रीसच्चिदानंदस्वामींनीं सदरील राईंतील अश्वत्थवृक्षाखालीं बसून कांहीं ग्रंथ लिहिले होते, त्यांपैकीं ''स्वानंदलहरि'' नांवाचा एक ग्रंथ उपलब्ध आहे. अलीकडे ७।८ वर्षे सदरील अभिषेक होत नसल्याचें समजतें.

बांद्रें,
''भामाकुञ्ज''
ता. २५।६।३५

भवदीय,
**वासुदेव अनंत बांबर्डेकर**

॥ श्री ॥

# साईसमर्थ

## ''माझें पहिलें स्वप्न व त्यापुढील अनुभव''

श्रीयुत संपादकमहाशय श्रीसाईलीलाकर्ते यांस सा. न. वि. वि.

रा. ब. प्रधान व श्री. नवलकर यांस ता. ९-७-१९३३ रोजीं कबूल केल्याप्रमाणें माझे अनुभव आपणाकडे पाठवीत आहें. तरी ते पसंत व लिहिण्यासारखे असल्यास त्यांस श्रीसाईलीलेंत स्थळ मिळावें अशी विनंती आहे.

माझी स्वतःची हकीकत मी श्रीसाईकृपेंकरून सर्व बाजूंनीं सुखी; परंतु सुख म्हटलें म्हणजे त्यामागें कांहीं तरी दुःख असावयाचें त्याप्रमाणें संततीच्या बाबतींत नजरसुख मात्र घेत असें व त्या नजरसुखाच्या विचारांत असें:—

## अनुभव पहिला

ता. १८-१०-१९३१ रोजीं पहाटे एक स्वप्न पडलें तें असें:- मी एका झाडाच्या पारावर सचिंत बसलों असतां दोन व्यक्ति ( नवरात्रांत माळ घेऊन जे फिरतात ते. ) मजसमोर येऊन म्हणूं लागले कीं, असा सचिंत कां? मी म्हणालों, काय सांगूं? असें म्हणतांच त्या जळत्या मलीत्याचीं विभूति काढून दिली व म्हणाले कीं, ही तुझ्या मुलाच्या कपाळीं लाव म्हणजे सर्व ठीक होईल. हें ऐकतांच मी जागा झालों व पाहतों तों मजजवळ कोणींही नाहीं. त्या वेळीं चांगलें उजाडलें होतें. हा दिवस रविवार व श्री-महालक्ष्मीच्या जत्रेचा हाता व पूर्वी ठरविल्याप्रमाणें आम्हांस दर्शनास जावयाचें होतें, म्हणून सकाळीं सर्व कामें उरकून मी माझ्या ८ महिन्यांच्या मुलास बरोबर घेऊन मार्केटमध्यें श्रीमहालक्ष्मीकरितां खण, पातळ व ओटी भरण्याचें सामान खरेदी करण्यास गेलों व तें सर्व घेऊन आम्ही ११ वाजतां घरीं परत आलों. जेवण वगैरे लौकरच उरकून घेतलें. कारण ३

वाजतां दर्शनास निघावयाचें होतें, त्या वेळीं मुलगा झोपला होता. त्यास जागा करण्याकरितां अंगास हात लागला, तों त्यास सडकून ताप भरलेला. अर्थात् श्रीमहालक्ष्मीच्या दर्शनाचा बेत रहित झाला, व माझे वडील बंधु डॉक्टरकडे गेले; परंतु त्या वेळीं ३ वाजले असल्यामुळें डॉक्टर डिस्पेन्सरीत नव्हते. तेव्हां त्यांना आणण्याकरितां त्यांच्या घरीं जावें लागलें. अर्थातच जरा वेळ लागला. त्या दरम्यान आमचे नातलग व आमच्या वडिलांचे मित्र रा. रा. रघुवीर भास्कर पुरंदरे हे माझ्या मुलास पाहण्याकरितां आले. मी त्यांना म्हणालों कीं, आज आम्ही जर देवीच्या दर्शनास गेलों असतों, तर तुमची-आमची भेट झाली नसती; परंतु मुलास एकाएकीं ताप आल्यामुळें जाण्याचें रहित झालें व बंधु डॉक्टर आणण्याकरितां गेले आहेत, तेही आतां येतील. इतकें मीं त्यांना सांगितलें, तोंच त्यांनीं आपल्या खिशांतील उदी व तीर्थाची बाटली काढिली व त्यांतून थोडी उदी घालून तीर्थ मुलास पाजण्याकरितां दिलें; ह्या वेळीं मुलाला ताप ३ पर्यंत होता व आम्हीही भ्यालेले असल्यामुळें तें त्यास पाजलें व पुन्हा स्वस्थ निजविलें. डॉक्टर येईपर्यंत आम्ही बसून होतों; डॉक्तर सुमारें ४–३० वाजतां आले व त्यांनीं मुलास तपासलें व म्हणाले कीं, ताप वगैरे कांहीं नाहीं. थोडी ग्लानि आल्यामुळें तो स्वस्थ आहे; काळजी करण्याचें कारण नाहीं, औषध पाठवून देतों. त्याप्रमाणें औषध आलें व आम्ही तें मुलास देण्याकरितां ज्या ग्लासांत काढलें तें ग्लास व औषधाची बाटली त्यानें एका लाथेनें फोडून टाकिली. अशा ३ बाटल्या फोडल्या. तेव्हां आम्ही औषध न देतां तो जें तीर्थ व उदी खुषीनें घेत असे, तें देऊं लागलों व श्रीसाईकृपें करून त्यास त्याजवरच आराम पडला, व माझी चिंता दूर झाली. हा सर्व प्रता[illegible] स्वप्नांतील दोन व्यक्ति व विभूति, म्हणजे उदी, तीर्थ व रा. रघुवीरदा[illegible] या वेळीं मीं श्रीसाईसमर्थांच्या समाधीचें दर्शन घेण्याचा नवस केला; पर[illegible] कार्य उरकलें म्हणजे नवसाची आठवण राहत नाहीं, त्याप्रमाणें झा[illegible] असें पाहतांच समर्थांनीं दुसरा अनुभव दिला.—

## अनुभव २ रा

ता. १४–२–३२ रोजीं दादरवर देवीची सांथ असल्यामुळें माझ्या डॉक्टरनीं स्वत: मेहनत घेऊन व्हॅक्सिनेटर यांस आणून माझ्या मुलास ता. ९–२–३२ रोजीं टोंचवून घेतलें व म्हणाले कीं, लस ताजी असल्यामुळें तापाचें प्रमाण जास्त झाल्यास भिण्याचें कारण नाहीं व तसें कांहीं वाटल्यास मला बोलवावें. त्याप्रमाणें सकाळीं मुलगा हुशार असतां ता. १४–२–३२ रोजीं संध्याकाळच्या वेळीं ताप एका-एकीं १०६ पर्यंत गेला व मुलास चैन पडेनासें झालें. ह्या वेळीं मी माझ्या एका मित्राबरोबर बोलत बसलों होतों; परंतु मुलानें मला हाक मारली व अंगणात त्याला मांडीवर घेऊन बसलों. तो ऐकेना तेव्हां त्याला त्याच्या आईला नेण्यास सांगितलें व पुन्हा गोष्टीस सुरवात केली; इतक्यांत मुलास एक वांती होऊन आकडी आली व डोळे फिरवून तो निचेष्ट पडला. हें पाहून आम्ही सर्व भिऊन गेलों व बंधूंनीं डॉक्टराकडे धांव घेतली ! परंतु श्रीसमर्थांच्या उदी व तीर्थाचा दुसरा अनुभव यावयाचा असल्यामुळें डॉक्टर बाहेर गेले होते व त्यांनाही येण्यास उशीर होणार होता; तेव्हां आम्हीं ऊदी व तीर्थ ( जे रा. पुरंदरे यांनीं आमच्याजवळ ठेवण्यास दिलें होतें तें ) घट्ट बसलेले दात उघडून थोडें दिलें. हें पोटांत जातांच मुलगा झोपेंतून जागा होतो त्याप्रमाणें उठून बसला. थोड्या वेळानें डॉक्टर आले; परंतु मुलानें त्यांना तपासूं दिलें नाहीं; तेव्हां नुसता अंगावरून हात फिर-वून ते गेले आणि औषध पाठवून दिलें. ह्या वेळींही मुलानें पूर्वीप्रमाणें बाटलीची वाट लावली, व औषध घेतलें नाहीं; परंतु उदी व तीर्थ वारंवार मागून घेत असे व अखेर त्यांवरच त्याला गुण पडला.

## अनुभव ३ रा

या वेळीं मात्र आम्ही साईबाबांस विनंती केली कीं, मुलास स्नान घातलं कीं आम्हीं मुलास आमल्या दर्शनास आणूं. त्याप्रमाणें

ता. २०-३-१९३२ रोजीं मनीं न पाहिलेल्या शिर्डीस रा. रघुवीर-दादासह आलों व श्रीसाईसमाधि व द्वारकामाईचें दर्शन घेतलें. आम्ही तेथें ता. २०-३-३२ ते २७-३-३२ पर्यंत होतों. परंतु मध्यें श्रीक्षेत्र नाशिक व त्र्यंबकेश्वरी जाण्याचें ठरविलें असल्यामुळें आम्ही येथून ता. १५-३-३२ रोजी निघण्याचा विचार केला होता व कोपरगांवी जाण्याकरितां श्रीक्षेत्र शिर्डी येथील श्री. खुशाल मारवाडी यांची बैल-गाडी सांगून ठेविली होती. त्याच रात्रीं सुमारें २-३० च्या सुमारास मला शौचास जावें लागलें व हातपाय धुण्यास विहिरीवर येतों तों रा. तात्या पाटिल, बाळा गुरव, वगैरे मंडळी तोंड धुण्यास आलेली पाहिल्या-मुळें मी त्यांना विचारिलें कीं, एवढ्या रात्रीं तोंड धुऊन कुठें निघाला ? तेव्हां त्यांनीं मला सांगितलें कीं, आम्ही नाशिकवरून मुंबईस जाणार आहोंत व मोटरींत तीन इसमांची भरती झाली पाहिजे. करितां तुम्हीही येणार असल्यास आमच्याबरोबर चला. हें ऐकून मला एक प्रकारचा आनंद झाला व विचार केला कीं, ही सर्व ओळखीची मंडळी आहे; तरी यांजबरोबर जाण्यास हरकत नाहीं. असें मनांत येतांच मी त्याच पायीं बिऱ्हाडीं आलों व, रा. रघुवीरदादांना उठविलें व वरील हकीगत त्यांना कळविली. त्यांनीही अनुमोदन देतांच लहान मुलास व कुटुंबास उठविलें व सर्व सामान तयार करून मोटरकडे चालते झालों. परंतु ईश्वरी इच्छा कांहीं निराळी ! कारण आम्ही श्रीसाईबाबांची काकडआरति व त्याचप्रमाणें सर्वांचा निरोप घेऊन निघणार होतों, तें सर्व चुकवून गाडीवाला आमच्या विश्वासावर अवलंबून असल्यामुळें त्यालाही फसवून मोटरींतून जाणार; मोटरींत आम्हीं सर्वांनीं आसन ठोकलें व मोटर चालविण्यास सांगून श्रीसाईबाबांचा जयजयकार केला; परंतु श्रीसाईबाबांच्या मनांतून आम्हांला जाऊं देण्याचें नसल्यामुळें मोटर जाग्यावरून हालेना. अखेर आम्हीं ढकलूनही पाहिलें; परंतु समर्थांनी जेथें अडवून ठेविली ती आम्हां मानवांना ढकलली जाणार कशी ? हें सर्व होई तों काकड-

आरति सुरू झाली व आम्ही सर्व सडकेवर मोटरच्या मागें लागलों. दिवस जसा वर आला, तसा आम्ही विचार केला कीं, आतां मोटरींतून न जातां ठरविलेली गाडी आणावी व तिनेंच जावें. त्याप्रमाणें रा. रघुवीरदादा गेले व श्री. खुशाल मारवाड्याची गाडी आणिली. त्याच गाडींत आम्ही ता. २२-३-३२ रोजीं दोनप्रहरीं, साकोरी, निर्मळ, पिंपरी येथें गेलों होतों व मुलगा सुमारें रात्रीं १० वाजेपर्यंत त्या गाडींत बसून आम्हाबरोबर फिरला; परंतु त्याला दिवसा १२-३० पासून रात्रीं १० वाजेपर्यंत कोणत्याच तऱ्हेचा त्रास झाला नाहीं व गाडीच्या बैलांबरोबर हसूनखेळून घरीं आनंदित परत आला. ता. २४-३-३२ रोजीं वे. रा. रा. नानू भट पुजारी यांस मीं विचारिलें कीं आम्हीं अभिषेक वगैरे करण्यांस सांगितलें होतें तें झालें का, तेव्हां त्यांनीं होय म्हणून उत्तर दिलें व त्यांनीं जास्त खर्चाचा आंकडा दिला, तसे मीं पैसे चुकते केले.

त्या गाडींत बसल्यानंतर मुलानें त्याला बोलता येत नसल्यामुळें मागें पाहून सारखें रडण्यास सुरवात केली; तेव्हां आम्हाला वाटलें कीं, त्याची झोंपमोड झाली असेल म्हणून रडतो; तेव्हां तो निजेल असें वाटून गाडींत निजण्याची सोय केली व त्याला निजविला; परंतु तो निजेना; उठून बसे व सारखा मागें पाहून रडे. पुन्हा आम्हांस वाटलें कीं, त्याला कांहीं तरी होत असावें; म्हणून औषध देऊन पाहिलें, तरीहि रडे! थांबेना. तेव्हां मी, माझें कुटुंब, व रा. रघुवीरदादा अशी आम्ही आळीपाळीनें त्याला घेऊन पायीं चालण्यास सुरुवात केली व अशा तऱ्हेनें आम्ही ६ मैल चालत गेलों. आतां कोपरगांव अवघा २ मैल राहिला; तरी तेथें जातांच मोटर अथवा टांग्यानें जाऊ असें ठरवितों तोंच मुलगा रडत असतां एकाएकी निश्चेष्ट पडला झालें! येथेंच आमचा रस्ता संपला. कारण मुलाला सर्व तऱ्हेनें शुद्धीवर येण्याचे उपाय केले. परंतु उपयोग झाला

नाही. तेव्हां विचार केला की, असें झालें तोंड घेऊन घरीं जाण्यापेक्षा, ज्याच्या दर्शनास आलों तेथें परत जावें व जें होणें असेल तें तेथेंच होईल. त्याप्रमाणें मुलाला गाडींत शववत् निजविला व त्याच्या आईला जवळ बसविलें आणि रा. खुशाल त्यांस सांगितलें कीं गाडी जितकी लौकर नेतां येईल तितकी दौडत घेऊन जा. आम्ही म्हणजे मी व रघुवीरदादा पायांनी येऊं. त्याप्रमाणें त्यांनीं गाडी १ तासांत श्रीसाईसमर्थांच्या मंदिराजवळ नेली व उभी करून माझ्या सौभाग्यवतीस उतरण्यास सांगितलें; इतक्यांत मुलगा झोंपेतून जागा होतो त्याप्रमाणें जागा होऊन स्वतः उठून बसला व दोन्ही हातांनीं सारख्या टाळ्या वाजवूं लागला. गाडीच्या खालीं येतांच रांगत जाऊन श्रीसाईसमर्थांच्या समाधीवर चढून गेला व टाळ्या वाजवूं लागला. पुढें ही हकीकत आम्हांस समजण्याकरितां रा. खुशाल हा तेथून परत फिरला व वरील आनंदाचें वृत्त आम्हांस रस्त्यांत कळविलें. तेव्हां मी सद्गदित होऊन श्रीसाईसमर्थांस नमस्कार करून आभार मानिले. पुढें वाड्यांत आल्यानंतर वे. नानू भटजींजवळ चौकशी केली कीं, आम्ही आपणांस सांगितल्याप्रमाणें सर्व केलें, कीं कांहीं वगळलें ? तेव्हां ते म्हणाले, कीं, अभिषेक, ब्राह्मण, सुवासिनी व भोजनखर्च इतकाच मागितला. दुसरें कांहीं केलें नाहीं; तरी जास्त पैसे कशाला घेऊं? तेव्हां सर्व बाकी राहिलेले नवस आम्हीं त्याच दिवशीं केले. श्रीक्षेत्र नाशिकहून रा. चांदवडकर आले होते त्यांजबरोबर सोलापूरचे कीर्तनकार आले होते. त्यांचें दोन दिवस कीर्तन करविलें; परंतु त्यांनीं माझ्याकडून एक पैही घेतली नाहीं. फक्त प्रसाद वांटण्यास सांगितला. दुसऱ्या दिवशीं शनिवारीं आम्ही ३ वाजतां श्रीसाईबाबांस चिठी टाकिली कीं, आम्हीं येथून केव्हां जाऊं ? उत्तर रविवारीं जा असें आलें । तेव्हां मी म्हणालों कीं, जर गाडी दारांत येईल, तरच येथून निघेन; नाहीपेक्षां दोन दिवसांची शिल्केंत असलेली रजा येथेंच पूर्ण करीन. परंतु रविवारीं बरोबर ३ वाजतां मोटर दारांत हजर व ती श्रीक्षेत्र नाशिक येथें जाणारी असून फक्त ३च इसमांची जरुरी होती.

करितां श्रीसाईबाबांस व सर्व देवांस नमस्कार करून आम्ही या गाडीनें श्रीक्षेत्र नाशिक येथें चिरंजीवाच्या हसण्याखिदळण्यांत मोठ्या आनंदानें आलों. यांतून इतकेंच घ्यावयाचें कीं, आपण ज्याप्रमाणें श्रीस नवस करा त्याप्रमाणें तो फेडण्यास विसरूं नये व विसरल्यास त्याची ते केव्हांच आठवण करून देतात.

## अनुभव ४ था

पूर्वी ठरविल्याप्रमाणें आम्हीं श्रीकृष्णजन्म पहिल्यानेंच करणार असल्यामुळेंच आम्ही श्रीक्षेत्र शिर्डी येथें जाऊन पहिल्यानें श्रीसाई-बाबांचा उत्सव पाहून व त्यांचें दर्शन घेऊन नंतर घरीं करणें तो पुढील वर्षी करावा असें ठरवून आम्हीं त्याप्रमाणें नानू पुजारी यांस कळविलें व ता. ५–८–३२ रोजीं शिर्डीस गेलों. हे पावसाचे दिवस असल्यामुळें मीं वे. नानु पुजारी यांना असेंही कळविलें कीं, नदीस पाणी जास्त असल्यास कोणी तरी इसम कोपरगांवास पाठवावा, म्हणजे आम्ही अनोळखी असल्या कारणानें त्याजबरोबर नदींतून जाण्यास बरें पडेल; परंतु नदीवर येऊन पाहतों तों शिर्डीचे कोणीही नाहींत; तेव्हां आम्हीं तेथील दोन हमाल ठरविले. त्याजजवळ व मी माझ्याबरोबर गडी घेतला होता त्याजजवळ सर्व सामान दिलें व तेथील हमालास आम्हांपुढें चाल-ण्यास सांगितलें. कारण ते म्हणाले कीं, नदीस पाणी थोडें आहे; करितां नांव चालत नाहीं; तेव्हां नदीची माहिती नसल्यामुळें मागोमाग चालूं लागलों. पुढें एक चतुर्थांश नदीपर्यंत गेलों असतां पाणी गुडघ्याच्यावर गेलें नाहीं व चालण्यासही कांहीं त्रास पडला नाहीं. परंतु निम्यावर गेल्यानंतर पाणी एकावी जोरानें वाहूं लागलें व चढूंही लागलें. तें इतकें कीं, कंबरेच्या-वर गेलें व पाण्याला जोर असल्यामुळें चालण्यासही जड जाऊं लागलें. मी माझ्या १॥ वर्षाच्या मुलास घेतलें होतें. सौभाग्यवती रिकामीच होती; परंतु ती जरा ठेंगणी असल्यामुळें पाणी छातीपर्यंत गेलें व चालण्यास शक्य

नाहीं असें पाहून मी तिला तशीच उभी राहण्यास सांगितलें व मीही निज-जवळ मुलास घेऊन उभा राहिलों गडयांच्याजवळ सामान असल्यामुळे त्यांनाही उभे राहणें भाग पडलें. कारण डोकीवर वजन व पाण्याला जोर जास्त. आम्ही उभे राहिलों असतां माझ्या मुलाच्या पायास पाणी लागलें, त्यामुळें तो भ्याला व रडण्यास लागला व म्हणूं लागला कीं, बाहेर चल. अशा स्थितींत त्याची समजूत करणें जरा कठीण गेलें; परंतु करणार काय ? मनुष्य प्रसंगांत सांपडला म्हणजेच परमेश्वराची आठवण होते. त्याप्रमाणें आम्हीं श्रीसाईबाबांचा धांवा केला व म्हणालों कीं देवा, आतां आमची शिर्डी येथेंच होते. कारण गडी सामानानें अडलेले व आम्ही न पोहतां येणारे. अशा स्थितींत मला जरा डोळ्यापुढें अंधेर आला असें वाटताच मीं जास्त भिऊन गेलों व एकदम श्रीसाईबाबा सांभाळा, असें म्हणालों व डोळे मिटून घेतले. इतक्यांत मला कोणीं तरी हाक मारीत आहे असें वाटलें व डोळे उघडून पाहतों तों खरोखरच रा. बाळा गुरव पुढें उभा ! त्याला पाहतांच आम्हाला आनंद झाला व आम्ही त्याला म्हणालों कीं पाहतो काय, आमचे हात धरा, नाहीं तर आम्हीं वाहून जाऊं. असें म्हणतांच त्यांनीं आमचे हात धरले व म्हणाला की मीं धरिलें असतां आपण वाहून जाणे शक्य नाहीं. आम्हीही म्हणालों की, खरोखरच कारण जर आम्ही वाहून जाणार असतों, तर श्रीसाईबाबांनीं आपणास पाठविलें नसतें; परंतु त्याच्या मनांतून आम्हाला वांचविणें असल्यामुळें त्यांनींच ही कृपा केली. अशा रीतीने आम्हांला रा. बाळा गुरवानें नदीकांठावर आणून सोडलें व म्हणाले कीं आपण मोटरीनें जा. मी मागून सायकलनें येईन. तेव्हां आम्ही त्याला म्हणालों कीं, तूं साईबाबांच्या रूपानें येऊन आमचा बचाव करून जात नाहींस ना ? कारण आम्हीं श्रींचा धावा करीत होतों. कसेंही असो. श्रींकडून आम्ही श्रीक्षेत्र शिर्डी येथें सुखरूप येऊन पोहचलों व येथें आम्ही ता. २१–८–३२ ते २८–८–३२ पर्यंत राहिलों व

याच वेळी श्रीद्वारकामाईस ऑईलपेन्ट केला; परंतु तो चांगला उठाव झाला नाहीं, म्हणून श्रीरामनवमीच्या अगोदर पुन्हा करूं असें ठरविलें.

## अनुभव ५ वा

माझ्या चिरंजिवाचें जावळ श्रीक्षेत्र काशी येथें करावें असें पूर्वीच ठरविलें होतें. त्यामुळें त्याचें जावळ फारच वाढलें असल्यामुळें सर्व सेवेकरी म्हणूं लागले कीं, हें येथेंच काढून घ्या. कारण सर्व तीर्थें येथेंच आहेत. तेव्हां मी म्हणालों कीं नवस काशीचा आहे व येथें केल्यास मला माझे नातलग म्हणतील कीं खर्चास भिऊन जावळ शिर्डी येथें केलें. तरी आपण सर्व असें करा कीं, श्रीसाईबाबांस चिठी टाका व जसें उत्तर येईल त्याप्रमाणें करून कोणीं दोष दिल्यास ती चिठी आपण दाखवूं. त्याप्रमाणें चिठी तीन वेळां टाकिली व उत्तर तिन्ही वेळां श्रीक्षेत्र काशी येथें करावें. असें आलें. तेव्हां अर्थातच सर्वांनीं सांगितलें कीं, जावळ काशींतच करा. यांत घेण्याचें इतकेंच कीं, ज्याचा नवस जसा असेल तसेंच झालें पाहिजे. आम्हीं येथून निघते वेळीं विनंती केली कीं, श्रीक्षेत्र काशी येथें जाण्यास निघते वेळीं आपलें दर्शन घेऊं. त्याप्रमाणें आम्ही श्रीक्षेत्र शिर्डी येथें ता. १६–१–१९३३ रोजीं आलों व पुन्हा चिठी टाकली व येथून श्रीक्षेत्र काशी येथें जाण्याचा हुकूम ता. २२–१–१९३३ रोजीं झाला. म्हणजे चिठीचें उत्तर आलें त्याप्रमाणें आम्हीं सर्व तयारी करून सामानाची आवराआवर केली, तेव्हां असें आढळून आलें कीं, बरोबर घेतलेल्या पितळी खलाचा बत्ता मिळेना; तेव्हां सर्व ठिकाणीं त्याचप्रमाणें सर्व सामान शोधून पाहिलें, परंतु मिळाला नाहीं. तेव्हां मी म्हणालों कीं, न मिळाला तरी हरकत नाहीं; कारण माझी खात्री आहे कीं, आपला एकही जिन्नस जाणें शक्य नाहीं. असें म्हणून आम्ही श्रींचा उदी, प्रसाद व आज्ञा घेऊन निघालों, निघते वेळीं आम्हीं म्हणालों कीं जावळ ज्या दिवशीं निर्विघ्न पार पडेल, त्याच दिवशीं म्हणजे जावळाच्या दिवशी श्रीस अभिषेक करण्यास तेथून

लिहूं. असें म्हणून आम्ही निघालों, ते श्रीक्षेत्र प्रयाग येथें दुसऱ्या दिवशीं सकाळी ११ वाजतां पोहोंचलों व स्नानाकरितां कपडे काढणार तोंच पत्र वर दिसला; तेव्हा मी आनंदानें म्हणालों कीं, पहा, मी म्हणालों त्याप्रमाणें झालें किंवा नाही ? कारण श्रीसाईबाबा केव्हांही कोणाचें मन खिन्न करणार नाहीत. व आपणास दोष लावून घेणार नाहींत. असो. येथून आम्ही श्रीक्षेत्र काशी येथें आलों व ता. ३०-१-३३ रोजीं जावळ करविण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें केलेंही व येथून श्रीक्षेत्र गया येथें आलों.

## अनुभव ६ वा

पूर्वी ठरविल्याप्रमाणें श्रीबाबांस अभिषेक करण्यास पत्र लिहिण्याचें राहिलें.अर्थात् ठरविल्या दिवशीं अभिषेक झाला नाहीं. श्रीक्षेत्र गया येथें आम्ही रात्रीं ११–३० ला पोंहचलों; तोंपर्यंत मुलगा चांगला खेळत होता; परंतु गयावळाच्या घरीं पाऊल टाकतांच मुलगा एकाएकीं गार पडला व चलनवलन राहिलें. हें पाहून आम्ही सर्वजण भिऊन गेलों. लांबचा प्रवास असल्या-मुळें सर्व तऱ्हेचीं औषधें जवळ ठेविलीं होतीं; परंतु त्यांतून एकही उपयोगी पडलें नाहीं; तेव्हां माझ्या कुटुंबानें श्रीच्या उदीची पुडी फोडली व म्हणाली कीं अभिषेक करण्याचें पत्र रा. नानू पुजारी यांस लिहिलें का ? मी म्हणालों कीं पत्र लिहिण्यास विसरलों तरी तूं उदी लावून पाहा. मी आतांच पत्र लिहितों व आतांच्या आतां पोस्टांत टाकण्याची व्यवस्था लावतों. मीं पत्र लिहिण्यास घेऊन पुरें केलें व तें गयावळाच्या नोकराजवळ देऊन त्यास तें पोस्टांत टाकण्यास सांगितलें. उदीचा प्रयोग होतांच मुलगा उठून बसला व त्याच्या आईस म्हणाला कीं, मला झोंप येते. तरी तूंही झोंप. इतके त्याचे शब्द ऐकतांच आम्हांस आनंद झाला व पत्र लिहिण्यास विसरलों, म्हणून श्रीसाईबाबांची प्रार्थना करून चुकीची क्षमा मागितली. हा अनुभव कसा तो पाहा. चुकी जाहली असल्यास वेळींच सावध करणें हा उदीचा प्रभाव ! असो. हा दिवसापासून आमचीं सर्व तीर्थें निर्विघ्न पार पडलीं व आम्ही घरीं सुखरूप परत आलों.

## अनुभव ७ वा

श्रीरामनवमीच्या उत्सवास येण्याचें पूर्वीच ठरविलें होतें. त्याप्रमाणें आम्ही श्रीक्षेत्र शिर्डी येथें ता. २-४-३३ रोजी सकाळीं ८-३० ला आलों. येतांना बरोबर ऑईलपेंट आणिला होता तो द्वारकामाईस लावण्यास त्याच दिवशीं सुरुवात केली व सोमवारीं दोन प्रहरच्या आंत सर्व लाविला. ह्या वेळीं आम्हीं दीक्षितवाडयांत उतरलों होतों. जत्रेचे दिवस असल्यामुळें सर्व तऱ्हेचीं दुकानें वाडयापुढेंच होतीं. तीं पाहून माझा लहान मुलगा हा ओटीवरच खेळत बसला होता व श्री॰ हरेराम हे आमच्या स्वभावानुसार आमच्या बिऱ्हाडीं होते. उत्सवांत मुलाला जेवण वेळेवर मिळणार नाहीं असें वाटल्यावरून आम्ही बरोबर स्टोव्ह घेतला होता. परंतु ह्याच दिवशीं मुलगा कांहीं एक न खातां सुमारें ३ वाजतां झोपी गेला व त्याच वेळीं त्याला सुमारें २ पर्यंत ताप चढला. हें पाहून मी व माझें कुटुंब भिऊन गेलों.कारण ४ दिवस राहावयाचे असल्या कारणानें व मुलाची प्रकृतीही चांगली असल्यानें आम्ही कोणतेंच औषध बरोबर घेतलें नाहीं. असो. हा दिवस श्रीसमर्थांची उदी व तीर्थ देऊन काढला. मंगळवारीं म्हणजे श्रींच्या उत्सवाच्या दिवशीं ताप ४ पर्यंत गेला, तेव्हां मी फारच भ्यालों आहें. हें पाहतांच श्री. हरेराम यांनीं डॉक्टर आणून तपासा असें सांगितलें. तेव्हां डॉक्टर आणणें म्हणजे कोपरगांवीं गेलें पाहिजे व मी तर येथील अनोळख. तेव्हां काय करावें, हा विचार पडला असतां रा. बाळा गुरव यांनीं आपला भाचा कोपरगांवास पाठविला व डॉ. मेथा यांस घेऊन येण्यास सांगितलें. तो जातो इतक्यांत बॅ. गाडगीळ हे त्यांजबरोबर आलेले भट डॉक्टर यांस घेऊन आले व मुलास तपासून सर्व केस लिहिली व त्याप्रमाणें डॉ. मेथा यांस औषध पाठविण्यास सांगितलें. डॉ. भट म्हणाले कीं, मुलगा निमोनियानें सीक झाला आहे. श्री. देशपांडे, त्याचप्रमाणें श्री. ह. प. दासगणू महाराज म्हणाले कीं, मुलगा विषमज्वरानें सीक आहे. हीं सर्वांचीं विधानें ऐकून माझीं सर्व गात्रें शिथिल झालीं व आतां काय

करावें हा विचार चालला असतां श्री. हरेराम म्हणाले की भिऊ नको, मुलाच्या केसालाही धक्का लागणार नाही व लागला तर शिर्डीस साईबाबाच नाही असें समज. मुलगा इंग्रजी औषध मुळींच घेत नसे, म्हणून मी रा. माधवराव देशपांडे यांना सांगितलें की, आपणच कांहीं योग्य औषध असल्यास द्यावें. परंतु ते म्हणत की, ताप उतरल्याखेरीज मी औषध देणार नाही. कारण ताप उतरल्याखेरीज तापाचें निदान ठरविणें बरोबर नाहीं व घाईनें कोणतेंच औषध देऊं नये. हें पाहतांच आम्हीं जें औषध डॉ. भट यांनीं सांगितलें तें दिलें; परंतु गुण न येतां दिवसेंदिवस तापाचें प्रमाण वाढूं लागलें व मुलगाही अशक्त झाला. तरी अशा स्थितींत तो श्रीसमाधी-पुढें नेण्यास सांगत असे व तेथें गेला म्हणजे नमस्कार करून परत येतांना ऊदी घेऊन येत असे. असा क्रम शुक्रवारपर्यंत चालू होता. परंतु शनिवारीं मुलानें समाधिमंदिरांतच राहण्याचा हट्ट घेतला व त्याप्रमाणें आम्हीं आमचें सामान वगैरे घेऊन दीक्षितवाड्यांतून समाधिमंदिरांत आलो. रा. तात्या पाटिलांच्या आग्रहावरून श्री. देशपांडे हे औषध देऊं लागले; परंतु गुण म्हणून कांहींच दिसला नाहीं. रा. शिरवळकरबुवा हें सर्व बाहेरचें कांहीं आहे काय, हें पाहून थकले; तरी गुण नाहीं; तेव्हां मीं निश्चय केला की आतां उदी व तीर्थ यांशिवाय कांहीं देणार नाहीं. श्रीसाईबाबांनीं पाहिजे तर जगवावा किंवा मारावा. त्यांना जसें वाटेल तसें ते करण्यास समर्थ आहेत. असें म्हणून कांहीं अपराध केल्यास मला क्षमा करावी व पुत्रदान देऊन मला जन्माचें ऋणी करावें. असो. ऊदी तीर्थ व श्रीचा धांवा ह्यानें मुलाचा ताप ११व्या दिवशीं उतरला. या सर्व दिवसांत जास्त कोणीं मुलाकरितां मेहनत केली असेल तर ती श्री. बाप्पाजी ग्रामजोशी यांनीं कोणत्याही तऱ्हेचा त्रास अथवा खेद न दाखवितां आपल्याच घरचें काम आहे असें समजून, जागणें व वेळोवेळीं पाहिजे ती मदत केली असल्यामुळें मी त्यांचा फार ऋणी आहें. असो. पुढें १४ व्या दिवशीं आम्हास घरीं जाण्याचा श्रीचा हुकूम मिळाला. त्याप्रमाणें आम्ही मुलला अशक्त स्थीतींत घेऊन आलों

परंतु रत्यांत तीन वेळां गाडीच्या धक्यानें डोळे फिरविले होते तरी पण ऊदी व तीर्थ यांनीं त्यास घरीं सुखरूप आणिलें. शिर्डीत मुलगा सीक असतां श्री हरेराम यांनीं आपल्या अंगावरील गरम शाल व उपरणें मुलाला पांघ-रण्याकरितां दिलें होतें. त्याचा उपयोग प्रसाद असें समजून करीत आहें आम्ही श्री हरेराम यांचे कसे ऊतराई होऊं तें एक देव जाणें. कारण त्यांनीं आम्हाला ऋणी करून ठेवलें आहे. ह्यावेळींही निघतांना आम्ही श्रींस नवस केला कीं, मुलगा फिरता हिंडता झाला, तर आम्ही गुरुपौर्णिमेस येऊं त्याप्रमाणें मुलगा फिरताहिंडता झाला व आम्हीं श्रींच्या दर्शनास गुरुपौर्णिमेस येऊन गेलों. ह्याच वेळीं श्री. नवलकर व रा. ब. प्रधान यांची माझी ओळख झाली व त्यांच्या हुकमानें मी माझे अनुभव लिहिले आहेत. कळावें.

साईदास,

**दादाजी गोपीनाथ जोशी**

५९५A. C. D. लेडी जमशेटजी रोड, दादर

श्रीसाईबाबा

# मे १९३५ चें शिर्डीवृत्त

मे महिन्यांत २५ संतप्रेमी मंडळी मुंबई, ठाणें, पुणें, अहमदनगर, नाशिक या ठिकाणाहून आली होती. त्यांत सरदार मिरीकर साहेब होते.

## २ श्रींस देणगी जिनसा वगैरे अर्पण केल्या त्या

१ रा. रा. राजाराम मांजरमकर—मांजरम. जि. नांदेड–लहान चांदीच्या पादुका भार ०॥=.

२ रा. रा. एकनाथ प्रल्हाद सुगांवकर–पुणें–पांढरा जरीचा रुमाल.

३ रा. रा. माधवराव सहस्त्रबुद्धे–शिर्डी–उदबत्तीचें लहान जर्मन सिल्व्हरचें घर.

४ रा. रा. बाळा काशिराम शिंपी चोपदार–शिर्डी–मुलाच्या लग्नाप्रीत्यर्थ श्रींस पिवळेकांठी उपरणें.

५ श्रीमती रतनबाई पार्शीण—मुंबई तांबडा सटीन २॥ वार, गुलाबी कापड वार १ व मांजरपाट वार ५; श्रींची समाधि पुसण्यास व श्रींचा फोटो पुसण्यास.

६ इतर श्रीसाईभक्तांकडून श्रींस नैवेद्य, अभिषेक वगैरे करण्यांत आले.

३ श्रींच्या समाधीच्या वरच्या बाजूनें अद्याप पाणी पाझरतें. ता१।५।३५ रोजीं ह. भ. प. दासगणू महाराज यांनीं श्रीअक्कलकोटस्वामी महाराज यांची पुण्यतिथि कीर्तन करून साजरी केली. त्यांनीं परशरामजयंतीप्रीत्यर्थ श्रींस अभिषेक करून शिरा हा प्रसाद वाटला व गाईंना चारा घातला व श्रीमंदिरासमोर रोषनाई केली. नृसिंहजयंतो-बद्दल त्यांनीं कीर्तन केलें व गाईंस चारा घातला व दीपोत्सव केला. ता. १४, २८, व ३० मे रोजीं दासगणूमहाराज यांनीं श्रीद्वारकामाईमध्यें कीर्तन केलें.

## ४ रौप्य ज्युबिली

राजे पंचम जॉर्ज यांना गादीवर बसून २५ वर्षे झालीं, त्याप्रीत्यर्थ रौप्य-ज्युबिलीसमारंभ शिर्डी संस्थानकमिटीनें साजरा केला, त्या वेळीं श्रींच्या पुढें ह. भ. प. किसनराव संस्थानचे गवई यांचें कीर्तन झालें व संस्थाननें त्याशिवाय शिर्डी गावांतील ज्युबिलीच्या उत्सवास रु. ५ दिले व रा. रा. वसंतराव ना. गोरक्षकर यांनीं त्याप्रीत्यर्थं सव्वा रुपयाचा शिरा हा प्रसाद श्रींस अर्पण करून तो सर्वांस वाटला. समारंभास रा. रा.

बाळासाहेब देव, रा. रा. माधवराव देशपांडे, रा. रा. तात्या पाटील, दासगणू महाराज, रा. रा. बापूराव बोरावके ही मंडळी हजर होती.

५ रा. रा. शरच्चंद्र आत्माराम आरोळकर, गुंटकल यांनीं श्रीचे पुढें गायन ता. ८।५।३५ रोजीं केलें. रा. रा. दत्तात्रय दामोदर रासने, पुणें यांनींही नेहमींप्रमाणें ता. ९।५।३५ रोजीं गायन केलें. ह. भ. प. भाऊराव वेहळकर यांनीं श्रीपुढें ता. ९।५।३५ रोजी कीर्तन केलें.

## ६ सभामंडप

सभामंडपाचें काम बंद आहे. तें बंद असण्याचें कारण मार्च महिन्याच्या शिर्डीवृत्तांत दिलें आहे. अद्यापपर्यंत त्याप्रीत्यर्थ भक्तांकडून मोठ्या रकमा आल्या नाहींत. त्या आल्याशिवाय काम सुरू करणें अशक्य झालें आहे. श्रीसाईबाबा भक्तांस प्रेरणा करून कामास लवकरच सुरवात करून घेतील अशी श्रींस प्रार्थना करितों. यापासून श्री "जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला । " हें तत्त्व पूर्णपणें निदर्शनास आणून दिलें.

## ७ संस्थानसमाचार

शिर्डी संस्थान पोटकमिटीची सभा सान्ताक्रुझ येथें रावबहादुर मोरेश्वर वि. प्रधान यांच्या बंगल्यात ता. ५ व २६ मे रोजीं भरल्या होत्या. त्या वेळीं पुढील कामास मंजुरी देण्यांत आली.

१ ह. भ. प. दासगणू महाराज यांच्या सूचनेवरून श्रीमंदिरांत दर गुरुवारीं या ऐवजीं प्रत्येक एकादशीस व त्याचप्रमाणें संतांच्या पुण्यतिथीस व ईश्वराच्या अवताराच्या जयंतीच्या दिवशीं संस्थानचे गवयीं यांनीं कीर्तन करावें.

२ संस्थानचा सेवेकरी रा. रा. बाळा काशिराम शिंपी चोपदार याचें साकोरीचा उपासनी शिर्डी येथें आला असतांना जें वर्तन घडलें, त्याबद्दल पोट कमिटीनें ठराव करून त्याचा जबाब मागविल्यावरून त्यानें त्या वर्तनाबद्दल माफी मागून दिलगीरी प्रदर्शित केल्यावरून पोटकमिटीनें मेहेरनजर करून त्याची माफी मंजूर केली. यापुढें त्यानें असे वर्तन करूं नये म्हणून त्यास सक्त ताकीद देण्यांत आली.

३ ह. भ. प. दासगणू महाराज यांनीं त्यांच्या श्रीरामनवमी शके १८५७ च्या उत्सवाच्या वृत्तांतांत असें लिहिलें आहे कीं, रविवार चैत्र शु॥. ११ च्या दिवशीं कीर्तन-

कृपानें त्यांनीं उपासनीची कानउघाडणी केली असें जरी म्हटलें आहे, तरी दासगणू हे शिर्डी संस्थानकमिटीचे अध्यक्ष असल्यामुळें त्यांनीं उपासनीच्या शब्दाला मान देऊन कीर्तनासच उभे राहावयाचें नव्हतें; परंतु ते उभे राहिले, म्हणून शिर्डी संस्थान पोटकमिटीला दिलगिरी वाटत आहे असा ठराव पोटकमिटीनें मंजूर केला.

४ संस्थानचे हल्लीं नेमलेले गवई रा. रा. किसनराव पार्थीकर, दासगणू महाराज यांचे शिष्य यांची संस्थानच्या गवयाच्या जागेची मुदत श्रावण व॥ ३० शके १८५७ पर्यंत वाढविली आहे. त्यानंतर भाद्रपद शुद्ध १ शके १८५७ पासून फाल्गुन व॥ ३० शके १८५७ पर्यंत रा. रा. विठ्ठलराव मराठे दासगणू महाराज यांचे दुसरे शिष्य यांची नेमणूक तूर्त सात महिन्यांपुरती केली आहे .

५ श्रीसमाधिमंदिर व श्रीद्वारकामाईमधील पेटयांतील जमा दोन्ही पेटया मिळून चैत्र शके १८५७ मासांत जमा एकंदर रु. ५१-२-६. श्रीमंदिरपेटींत रु. ४७-१३-६ व श्रीद्वारकामाई पेटींत रु. ३-५-० रकमा आल्या. ता. ३।५।३५.

शिर्डी येथील हवा उत्तम आहे. पाऊस अद्याप नाहीं. मात्र लेंडीबागेस पूर येऊन गेला. उष्मा जास्त आहे.

श्रीसाईभुवन,
१४१ प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई २
ता. ३ जून १९३५

सुंदरराव दि. नवलकर,
ऑ. चिटणीस,
शिर्डीसंस्थान कमिटी

## श्रीदत्तचित्साई सद्गुरुर्व्योजयः

श्रीयुत रा. रा. श्रीसाईलीला संपादक महाशय यांस,

कृ. सा. न. वि. वि.

सोबत श्रीशिरडी संस्थानच्या मालकीच्या पुष्कराजखचित सोन्याची अंगठी, सोन्याचें गुलाबचें फूल, मोती वगैरे वस्तूंची, चांदी, पितळ, तांबें, अल्युमिनम्, लोखंड वगैरे धातूंची भांडीं व वस्तु यांची यादी, तसेंच कपड्यांची यादी आपल्याकडे श्रीसाईलीलेंत प्रसिद्धिकरितां पाठविल्या आहेत; तरी कृपेनें त्या प्रसिद्ध कराव्या ही विज्ञापना—

आपला नम्र

श्रीक्षेत्र शिरडी,
ता. १–५–३५.
वैशाख शु. ८ शके
१८५७

सेवक
बालकृष्ण विश्वनाथ देव
व
रघुवीर भास्कर पुरंदरे

| अ. नंबर | जिनसांचें नांव व तपशील |
|---|---|
| | **सोमवारीं घालण्याचे कपडे** |
| १ | उपरणें सुती, गंगा जमुनी जरीकाठी |
| २ | उपरणें जरीकाठी |
| ३ | धोतर पांढरें, हात ९ रेशमी. |
| ४ | उपरणें रेशमी पांढरें नागपुरी |
| ५ | गलेफ पांढरा इमिटेशन रेशमी फितीसह |
| ६ | उपरणें पांढरें सुती पिवळी किनार. |
| ७ | गलेफ " जुनें जरी उपरण्याचा केलेला |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | उपरणें | ” | जरी कांठी इमिटेशन |
| ९ | उपरणें | ” | साधे मध्यें इमिटेशन कापड |
| १० | गलेफ | ” | साधा मलमलचा |
| ११ | उपरणें | ” | रेशीमकांठी |
| १२ | उपरणें | ” | ” ” |
| १३ | उपरणें | ” | रेशीम जरीकांठी |
| १४ | उपरणें | ” | बारीक जरीकांठी |
| १५ | गलेफ | ” | रेशमी मध्येंजरीच्या फुल्या |
| १६ | उपरणें | ” | जरीकांठी |
| १७ | चादर | ” | पांढरी सुती. |

### मंगळवार

| | |
|---|---|
| १८ | पीतांबर तांबडा जरीकांठी रेशमी |
| १९ | पीतांबर तांबडा जरीकांठी रेशमी जुना |
| २० | पीतांबर ” ” ” |
| २१ | पीतांबर ( पामरी ) ” ” नवें |
| २२ | गलेफ तांबडा इमिटेशन लावलेला |
| २३ | शालु ” जरीकांठी सुती खोटा |
| २४ | गलेफ ” इमिटेशन फित लावलेला |
| २५ | गलेफ ” ” ” |
| २६ | पटी ” ” ” |
| २७ | रुमाल ” सुती जरीकांठी |
| २८ | पटी ” इमिटेशन फित लावलेला |
| २९ | कापड ” हात ६ इमिटेशन रेशमी. |

### बुधवार

| | |
|---|---|
| ३० | पामरी गुलाबी रेशमी जरीकांठी |
| ३१ | उपरणें ” खोटें जरीकांठी इमिटेशन |

३२ गफेल गुलाबी रेशमी.
३३ कापड इ. टे. रेशमी फित लावलेला झालर जांभळी.
३४ गफेल गुलाबी इ. टे. रेशमी.
३५ गफेल ,, ,, ,, ,,
३६ गफेल भगवा , ,, ,,
३७ गफेल ,, ,, ,, ,,
३८ गफेल गुलाबी ,, ,, ,,
३९ गफेल ,, सुती
४० गफेल ,, इ. टे. फुल असलेला
४१ पातळ ,, नेसण्याचें हिरवें जरीकांठी रंग फिका भगवा

## गुरुवार

४२ पीतांबर हिरवा रे. कांठी रे.
४३ शालु ,, बुटयाचा रे. जरीचा.
४४ शालु ,, ,, ,, ,,
४५ शालु ,, जरीकांठी गर्भरेशमी श्री. नाना सा. रासने.
४६ गलेफ ,, सुती झालर गुलाबी
४७ पटी ,, इ. टे. फित लावलेला
४८ गलेफ ,, सुती फित लावलेला
४९ गलेफ ,, इ. टे. पांढरी फीत.
५० फडके ,, १ वीत रुंद १॥ हात लां. श्री. सुंदरराव नवलकर
५१ कापड ,, इ. टे. हात ५ फुलाचे
५२ गलेफ ,, ,, फीत लावलेला
५३ गलेफ ,, ,, ,, ,,
५४ गलेफ ,, ,, ,, ,,
५५ गलेफ ,, फित नाहीं; फुलाचा
५६ गलेफ ,, मध्ये गुलाबी फुलें

## शुक्रवार

५७ पामरी आस्मानी जरी कांठी रे
५८ गलेफ ,, इ. टे. फीत लावलेला
५९ पामरी ,, जरी कांठी रेशमी
६० पीतांबर ,, ,, ,, ,,
६१ गलेफ ,, रेशमी फीत लावलेला
६२ गलेफ ,, झालर सुती.
६३ गलेफ आस्मानी. इ. टे.झालरीसह फुलांचा.
६४ कापड ,, फुलाचें हात ५
६५ गलेफ ,, फुलाचें काळीफित.
६६ गलेफ ,, ,, इ. टे. फीत लावलेला
६७ चादर ,, खोटया जरीच्या काडयामध्यें.

## शनिवार

६८ कापड पिंवळा इ. टे. फुलाचें हात ६
६९ कापड ,, ,, ,, ,, ३
७० पट्टी केशरी इ टे. केशरी हात ५
७१ कापड ,, इ. टे. गुलाबी हात ५ हिरवा
७२ गलेफ ,, फुल्या असलेलें रेशमी
७३ पीतांबर पिंवळा जरी काठी ,,
७४ पीतांबर ,, ,, ,, ,,
७५ शेला ,, ,, ,, सुती
७६ शेला ,, ,, ,, ,,
७७ पामरी ,, रेशमी इ. टे.
७८ गलेफ ,, ,, ,, फीत लावलेला
७९ गलेफ ,, ,, ,, ,, ,,

## रविवार

८० पामरी जांभळा जरी कांठी रेशमी
८१ पामरी ,, जरीकांठी इ. टे. रेशमी
८२ शालू ,, ,, ,, रेशमी
८३ रुमाल ,, ,, ,, इ. टे. रेशमी
८४ गलेफ ,, बुटयाचा इ. टे. ,,
८५ गलेफ ,, जरी कांठी ,, ,,
८६ गलेफ निळा फीत लावलेला इ. टे.
८७ गलेफ कुसुंबी फुलाचा इ. टे. फित लावलेला
८८ रग पिवळा फित लावलेला इ. टे. रेशमी
८९ शाल भगवी जरीच्या फुल्या झालरीसह
९० शाल केशरी इ. टे. रेशमी
९१ शाल तांबडी जरीकांठी
९२ शाल तपकिरी ,, ,,
९३ धोतर् जोडा रेशमीकांठ गंगा जमुनी
९४ शाल पिवळी सुती
९५ रुमाल हिरवा जरीचा इ. टे.
९६ कापड पिंवळें सुती हात ५
९७ शेला निळा जरीकांठी इ. टे. रे. जुना
९८ कापड हिरवे सुती हात २
९९ कापड पोपटी सुती हात २
१०० अंगरखा निळा इ. टे. रेशमी
१०१ पट्टी गुलाबी फित सुती
१०२ गलेफ हिरवा सुती
१०३ आभ्रे गुलाबी इ. टे. रे.
१०४ आभ्रे कुसुंबी ,, ,, ,,

१०५ आभ्रे पिंवळे ,, ,, ,,
१०६ आभ्रे हिरवे ,, ,, ,,
१०७ आभ्रे पांढरे ,, ,, ,,
१०८ आभ्रा आस्मानी,, ,, ,,
१०९ उपरणें सुती हिरवे कांठी
११० उपरणें ,, तांबडें कांठी
१११ उपरणें ,, पिवळे ,,
११२ उपरणें ,, शुभ्र ,,
११३ आभ्रे पांढरे इ. टे रे. फीत लावलेला
११४ गलेफ पोपटी इ. टे. रे.
२१५ आभ्रे जांभळे ,, ,, ,,
११६ गलेफ हिरवा ,, ,, ,,
११७ ,, ,, ,, ,, ,,
११८ ,, ,, गुलाबी
११९ शाल पिंवळी खादी सुती
१२० कापड तांबडें गजनीचे
१२१ कापड पिंवळे सुती हात ४
१२२ ,, पांढरे इ. रे. हात ४
१२३ कापड पांढरे इ. टे. रे. हात ३
१२४ ,, ,, इ. टे. रे. हात ३
१२५ ,, पोपटी सुती ,, ४
१२६ टुवाल पांढरे ,,
१२७ ,, ,,
१२८ ,, ,,
१२९ ,, ,,
१३० रुमाल ,, जाळीचा.

१३१ कापड केशरी इ. टे. रे. हात २
१३२ पीतांबर जांभळा रे. जरीकाठी
१३३ गलेफ हिरवा इ. ट. रे. फित लावलेला
१३४ ,, तुकडा गुलाबी इ. टे. ,, ,,
१३५ पट्टी रुमाल हिरवी
१३६ कापड हिरवें सुती वेलबुट्टी हात ३
१३७ गलेफ गुलाबी इ. टे. रे फीत लावलेला.
१३८ शाल पांढरी सुती खादीची
१३९ फडकी हिरवी ,, इ. ,, रे. हात ४
१४० फडकी ,, इ. टे. रे. हात ४
१४१ पीतांबर पिंवळा. रे. गंगा जमुनी
१४२ ,, केशरी ,, जरीकांठी
१४३ मच्छरदाणी पांढरी. सुती
१४४ उशी तांबडी श्री. देव. इ. टे.
१४५ ,, पोपटी मखमली
१४६ ,, ,, ,,
१४७ अंगरखा तांबडा जरीबुट्टयाचा मखमली.
१४८ गलेफ ,, खरी जरीचा ,,
१४९ गादी हिरवी. सिंहासन द्वारकामाई हिरवी आसनासही मखमल
१५० ,, तांबडी चावडींतील अभ्र्यासह मखमल
१५१ तक्या हिरवा चावडींत ,, ,,
१५२ सतरंजी काळी. ,,
१५३ गादी तांबडी पालखीच्या गजनीची
१५४ तक्या तांबडा ,, ,,
१५५ लोड ,, ,, इ. टे. रे.

१५६ उशी पिवळी ,, मखमलीची
१५७ उशी तांबडी
१५८ छत तांबडें
१५९ सतरंजी काळी सुती
१६० गादी निळी
१६१ झुल रंगीबेरंगी घोडयाची
१६२ गादी तांबडी मखमली
१६३ पडदा ,, गजनीचा
१६४ झुल पिवळी इ. टे. रे.
१६५ गलेफ हिरवा ,, ,, ,,
१६६ गलेफ गुलाबी रे. मध्यें जरीच्या फुल्यां
१६७ ,, ,, ,, ,,
१६८ पट्टी हिरवी बुटयाचा आभ्र्यासह
१६९ तक्या हिरवा गजनीची ,,
१७० गादी तांबडी मखमलीची ,,
१७१ ,, ,, गजनीची
१७२ ,, ,, ,,
१७३ उशी लाल ,,
१७४ ,, ,, ,,
१७५ ,, ,, ,,
१७६ उशी निळी मखमलीची
१७७ ,, ,, ,,
१७८ ,, ,, बुटयाची आभ्र्यासह
१७९ ,, ,, ,, ,,
१८० लोड हिरवा मखमल आभ्र्यासह

१८१ तक्या तांबडा ,, ,,
१८२ उशी ,, रेशमी ,,
१८३ तक्या ,, लहान मखमली
१८४ उशी ,, अगदीं लहान
१८५ गालीच्या तपकिरी
१८६ सतरंजी काळी नवी
१८७ ,, तांबडी जुनी
१८८ ,, काळी ,,
१८९ ,, ,, ,,
१९० जाजम पांढरा खादी पडदा
१९१ ,, ,, ,, ,,
१९२ ,, तांबडा खारवाचा
१९३ शाल हिरवी
१९४ ,, भगवी
१९५ गलेफ केशरी चौ. साटीन अस्मानी किनार
१९६ टुवाल पांढरा
१९७ ,, ,,
१९८ ,, ,,
१९९ ,, ,,
२०० उपरणें ,,
२०१ ,, ,, नागपुरी रेशमी
२०२ गलेफ जांभळा इ. टे. रे. फित लावलेला
२०३ ,, ,, इ. टे. रे. बायल
२०४ शाल पांढरी चौकोनी खादी
२०५ आसन निळें चौकोनी
२०६ गोमुखी हिरवी बनातीची

२०७ रुमाल अस्मानी हातरुमाल
२०८ धोतर पांढरें काठबारीक ९ हात
२०९ उशी जांभळी इ. टे. रे.
२१० ,, ,, ,,
२११ सतरंजी हिरवी हा. ६×६
२१२ आभ्रा हिरवा इ. टे. रे.
२१३ ,, गुलाबी ,,
२१४ शेला अस्मानी जरी बुट्टी
२१५ गलेफ पिरोजा जरीची फीत
२१६ सदरा मलमल
२१७ रुमाल ,,
२१८ झबलें गुलाबी
२१९ कपडे हिरवे

( अपूर्ण )

## वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याच्या अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमच्याकडे करावा.

४ लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

## वार्षिक वर्गणी

वार्षिक वर्गणी टपालखर्चासह मनिऑर्डरनें आगाऊ रु. ३।=, व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।=, मागील अंकास शिल्लक असल्यास ॥-

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

## लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर, मार्जिन सोडून, सुवाच्य बाळबोध लिपींत असावी. पेन्सिलीनें किंवा कागदाच्या दोन्हीं बाजूंस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धि द्यावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंती अगर नापसंती कळविली जाईल. पसंती कळविल्यानंतर, आम्हांला कळविल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमच्याकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक, **श्रीसाईलीला**

दक्षिणा प्राइझ कमिटीने बक्षिस दिलेला व केसरी, चित्रमयजगत्, ज्ञानप्रकाश
विविधज्ञानविस्तार, व रत्नाकर वगैरे पुस्तकें व मासिकांनीं उत्कृष्ट अभिप्राय
दिलेला असा संतकवि ह. भ. प. श्री दासगणूमहाराज यांनीं
नवीन रचिलेला व प्रोफेसर श्री. नी. चाफेकर, M. A., LL. B.
यांनी प्रस्तावना लिहिलेला नवीन ग्रंथ

**श्री पासष्टी-भावार्थ-दीपिका**

हा नरेंद्र बुक डेपो, दादर, मुंबई येथें मिळेल.

काापडी प्रत १० आणे. साधी प्रत ८ आणे.

**सर्व प्रकारच्या मेंदूच्या विकारांवर जाग्रण व मानसिक श्रम करणाऱ्यांस अत्यंत उपयोगी**

नकलेबद्दल ] **ब्राह्मी तेल** [ सावध राहावें.

**बाळबाळंतिणीकरितां औषधें**

**बाळंतकाढा** नं. १—पहिल्या दहा दिवसांचा ०/१४; **बाळंतकाढा** नं. २ दहा दिवसानंतर ०/१४; **बाळकडू**:—मूल जन्मल्यापासून देण्यास योग्य ०/८; **कुमारीआसव** लहान मुलांकरितां ०/१२.

**सतत २५ वर्षें लोकादरास पात्र झालेलें, कोणत्याही ऋतूंत घेण्यास योग्य, अत्यंत मधुर व आरोग्यदायक**

एक रत्तल १/१० ) **द्राक्षासव** ( अर्धा रत्तल ०/१४
दीड रत्तल २/८ ट. ख. पॅ. नि.

शिवाय आमच्या कारखान्यांत टिकाऊ तयार काढे, आसवें, अरिष्टें, भस्में वगैरे ५०० वर औषधें तयार आहेत. त्यांच्या माहितीचा मोठा कॅटलाग व प्रकृतिमान भरून पाठविण्याकरितां "रुग्ण-पत्रिका" हीं सात आण्यांचीं तिकिटें आलीं असतां पाठवूं.

**दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स.** आर्यौषधी कारखाना, चेंबूर, जि. ठाणें.
ट. नं. ८७०२४ X २२२७८. दुकान दवाखाना, ठाकुरद्वार, **मुंबई** नं. २
पुणें:—**श्री साईनाथ** आणि **कंपनी**

हें पुस्तक श्रीलक्ष्मीनारायण छापखाना, २६४ ठाकुरद्वार, मुंबई
येथें रामचंद्र काशीनाथ तरुणीस यांनीं छापून
रा. आ. तर्खड यांनीं ५ सेंट मार्टिन्स रोड, बांद्रें येथें प्रसिद्ध केलें.